स.फौ.मा.क्र. १९३/२०१४
सरकार –वि– कन्हैयालाल व इतर
<u>निशाणी क्रमांक ४९</u>

**<u>सदर प्रकरणात आरोपी क्र.१ चे प्रकरण आरोपी क्र.२ पासुन वेगळे करण्यात आले आहे.</u>**

**<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०३ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– रामेश्वर दयाराम बघे
वय :– ६६ वर्ष, व्यवसाय :– सेवानिवृत्त,
राहणार :– खामगांव, ता.खामगांव, जि. बूलडाणा.

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. सन २०१४ मध्ये मी पोलीस स्टेशन शेगांव शहर येथे एएसआय या पदावर कार्यरत होतो. दिनांक १५.१०.२०१३ रोजी माझी डयुटी नवदुर्गा विर्सजन बंदोबस्ताकामी लागली होती. मिरवणुकदरम्यान शितला माता मंदीरासमोर जय भवानी मंडळाचे म्युझीकचा ध्वनी मोजला असता ९२.९ डेसीबस असा दिसला. त्यावेळी ध्वनीमापक यंत्र पोलीस कॉन्स्टेबल २१५६ यांचे ताब्यात होते. त्यांनी स्वत: ध्वनीमापक यंत्राद्वारे आवाजाची तीव्रता तपासणी केली असता ती ९२.९ डेसीबल एवढी आल्याने सदर ध्वनी मापक यंत्रणातुन प्रींट काढुन कन्हैयालाल उर्फ बाबुलाल मख्खनलाल शर्मा हे सदर मंडळाचे व्यक्ती हजर होते त्यांना सदर प्रिंटची प्रत देवुन घटनास्थळी हेड कॉन्स्टेबल १४७८ यांनी पंचनामा केला व फिर्याद देवुन गुन्हा दाखल केला. सदर पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला होता. जय भवानी मंडळ यांनी न्यु सरगम म्युझीकल बॅन्जो पार्टी यांची नेमणुक केली होती. नियमाप्रमाणे सर्वसाधारण डेसीबल हा ५० चे खाली असायला हवा. मी संपुर्ण कार्यवाहीचे वेळेस घटनास्थळी हजर होतो. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान माझे बयाण नोंदविले होते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाही. आरोपीला न्यायालयात हजर राहण्यापासुन नि.क्र.४८ प्रमाणे सुट देण्यात आली आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.तायडे वकील साहेब यांचेमार्फत.</u>**

**२.** माझी नोकरी एकुण ३६ वर्ष ११ महिने २० दिवस एवढी झाली आहे. हे म्हणने खरे आहे की त्यामुळे मला पोलीसांच्या कार्यवाहीबददलची संपुर्ण माहिती आहे. हे म्हणने खरे आहे की कर्तव्यावर जाण्याआधी पोलीस स्टेशन डायरीमध्ये तशी नोंद करावी लागते.

**प्रश्न**–तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान तुमच्याकडुन तुमची डयुटी मिरवणुकीसाठी

लागलेली आहे याबाबत स्टेशन डायरीमध्ये केलेली नोंद प्राप्त केली काय.

**उत्तर**– तपासी अधीकारी यांनी तशी नोंद प्राप्त केली नाही कारण तशी गरज नसते.

हे म्हणने खरे नाही की दिनांक १५.१०.२०१३ रोजी मी विर्सजन मिरवणुकीसाठी हजर नव्हतो. माझा जबाब तपासी अधिकारी यांनी त्याच दिवशी नोंदविला. हे म्हणने खरे आहे की शितला माता मंदीर व माळीपुरा हे दोन वेगळे ठिकाणे आहेत.

**प्रश्न**– तुमच्या समक्ष नवदुर्गा विर्सजनाच्या वेळेस जय भवानी मंडळासबंधी कुठले कागदपत्र तपासी अधिकारी यांनी जप्त केले काय.

**उत्तर**– माझे समक्ष जप्त केले नाही मी प्रत्यक्षात तेथे हजर असल्यामुळे मला त्याची माहिती आहे.

हे म्हणने खरे आहे की ध्वनीमापक यंत्रणेतुन डेसीबल बददलची काढलेली रिसीप्टवर मंडळाचे नांव लिहीणे अनिवार्य आहे. हे म्हणने खरे नाही की ज्या ठिकाणी आवाज नियमापेक्षा जास्त डेसीबलचा असतो व ज्या ठिकाणी ध्वनीमापक यंत्रणेतुन प्रिंट काढली जाते त्या ठिकाणचे नांव सदर रीसीप्टवर लिहीणे आवश्यक आहे. जिथे ध्वनी जास्त असतो त्याच ठिकाणी ध्वनीमापक यंत्रणेतुन मोजणी केली जाते. जे ध्वनीमापक यंत्र आम्ही घटनेच्या वेळी वापरले होते ते आमचे पोलीस स्टेशनमधुन आणले होते. जय भवानी मंडळाला मिरवणुकीबाबतची परवाणगी प्राप्त होती. रिसीप्ट ही १९.३० मिनीटांनी काढली होती. हे म्हणने खरे नाही की माझेसमक्ष कोणतीही रिसीप्ट काढण्यात आली नाही, पोलीस कर्मचारी ब.क्र.२१५६ व १९७८ हे माझ्याच खात्यातील असल्याने त्यांचे सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे व त्यांनीच मला सदर मंडळाचे नांव व अध्यक्षाचे नांव सुचविले आहे. हे म्हणने खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे व मी सरतपासात सांगीतलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणने खरे नाही की तपासी अधिकारी यांनी माझा कोणताही जबाब नोंदविला नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

MADHURI KEWAL GOTE

**( एम. के. गोटे )**

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

शेगाव. (कोर्ट नं.२)

**दिनांक – ३०.०१.२०२६**

**माझे समक्ष,**

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.01.30 17:23:54 +0530

**( एम. के. गोटे )**

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

शेगाव. (कोर्ट नं.२)

**दिनांक – ३०.०१.२०२६**